**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==================================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
--------------------------------------------------------------------------------------------------------
**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**
==================================================================

# संतसाहित्याची प्रासंगिकता

**डॉ.राजाराम अं.झोडगे**

**मराठी विभाग प्रमुख, नूतन महाविद्यालय, सेलू**

प्राचीन मराठी साहित्याचा विचार करताना संत,पंत व तंत (शाहिरी) अशा तीन परंपरा प्रामुख्याने दिसून येतात. या परंपरेतील साहित्याने येथील जनमानसावर आपला अमीट ठसा उमटवला. तत्कालीन परिस्थितीत अज्ञान,अंधश्रद्धा, कर्मकांडाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या समाजाला ज्ञान, विवेकाच्या प्रकाशात खऱ्या देव, धर्म,श्रद्धेची ओळख करून देण्याचे कार्य संतसाहित्याने केले. संत नामदेव,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, संत एकनाथ,संत चोखामेळा,संत सावता माळी,संत रामदास अशा अनेक संतांनी आपल्या रचनांतून ईश्वरभक्तीबरोबरच समाजजीवनावर संस्कार करण्याचे काम केले.

परकीय आक्रमणे,भौतिक दुरावस्था,अज्ञान आणि त्यातून आलेली मानसिक गुलामगिरी यांत सर्वसामान्य जनता भरडून निघत होती अशा अगतिक व असहाय बनलेल्या लोकांचे दु:ख पाहून

बुडती हे जन| न देखवे डोळा|
म्हणोनिया कळवळा| येतसे||

या तळमळीतून येथील समाजाला संतांनी दिशा दिली. अभंग, ओवी,गवळण, भारुड, पदं,विराण्या अशा विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमातून आपली अभिव्यक्ती केली.मराठी संतांचे लेखन हे प्रामुख्याने लौकिक आणि पारलौकिक अशा दोन पातळ्यांवरील विचार मांडणारे आहे. मूलत: भक्ती आणि त्यातून ईश्वरप्राप्ती, पारलौकिक जीवनाचे कल्याण, जन्म-मृत्यूचा फेरा चुकवणे या बाबी संतांच्या विचारात अग्रस्थानी असल्या तरी लौकिक जीवन,इहवाद त्यांनी नाकारलेला नाही. देव,धर्म,संस्कृती हे संतांच्या विचारविश्वाचे मूळ केंद्र असले तरी तत्कालीन समाजात धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात माजलेली बजबजपुरी,धार्मिक गुलामगिरी पाहता सामाजिक आशयही त्यांच्या साहित्यात प्रामुख्याने आला.

तत्कालीन समाजात उच्चवर्णीय धर्ममार्तंडांनी धार्मिक सत्ता आपल्या हाती एकवटलेली होती व त्याआधारे समाजातील मोठ्या वर्गास आपल्या अंकित केले. सामान्यजनांमध्ये दारिद्र्य,अज्ञान यामुळे कमालीची अंधश्रद्धा,कर्मकांड यांचे प्राबल्य वाढलेले असल्याने खरा देव,धर्म, तत्त्वज्ञान यापासून ते दूर होते. हे ओळखून संतांनी सर्वप्रथम येथील अंधश्रद्धा,कर्मकांड,भोंदूगिरी यावर प्रहार केले व प्रत्येक मनुष्याला भक्ती आणि सदाचरणाने ईश्वरापर्यंत पोहोचता येईल,आपली अध्यात्मिक उन्नती साधता येईल हा विश्वास निर्माण केला. चित्त शुद्ध असेल आणि विठ्ठलप्राप्तीची अनिवार ओढ असेल तर

व्यक्तीला ईश्वरभेटीपासून कोणीही रोखू शकत नाही. जात,धर्म,पंथ,लिंग,वर्ण,व्यवसाय अशा कुठल्याही बाबी भक्त आणि ईश्वराच्या आड येऊ शकत नाहीत हा विचार त्यांनी बिंबवला. हे करताना त्यांना प्रसंगी समाजाचा विरोध पत्करावा लागला परंतु "मनुष्याचा मोठेपणा हा त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेवर नसून वैयक्तिक चारित्र्यावर आहे ही गोष्ट त्यांनी पुन:पुन्हा आवर्जून सांगितली. सामाजिक विषमतेमुळे निर्माण झालेला बहुजन समाजातील न्यूनगंड नाहीसा करून त्याच्या प्रगतीला उपकारक होतील अशी नवे मूल्ये प्रचारात आणण्याची त्यांची खटपट होती. सनातनी पंडितांचा विरोध त्यांनी शांतपणे सहन केला; पण आपल्या मार्गापासून ते रेसभरही ढळले नाहीत."[१]

वर्णवर्चस्व, जातीभेद हा तात्कालीन समाजातील एक कळीचा मुद्दा होता; सामाजिक ऐक्य,धार्मिक सलोख्यातील ती एक मोठी धोंड होती.संतांनी आपल्या साहित्यातून या जातीभेदावर मार्मिक भाष्य केले. अध्यात्मिक मार्गात जातीभेद अप्रमाण मानून

विष्णुमय जग| वैष्णवांचा धर्म|
भेदाभेद भ्रम|अमंगळ||

हा विचार मांडला. सृष्टीच्या चराचरात ईश्वर भरलेला असून ईश्वरापुढे सर्व समान,एक आहेत.भक्तीसंप्रदायात कोणीही उच्च-नीच, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत नाही.आपण सर्व त्या एका ईश्वराचे अंश आहोत त्यामुळे केवळ विशिष्ट वर्णातील मनुष्यासच नव्हे तर समाजाच्या सर्वच घटकांतील लोकांना भक्तीचा, आत्मिक उन्नतीचा अधिकार असल्याचा समतावादी विचार संतांनी दिला.त्यामुळेच भक्ती संप्रदायात संत ज्ञानदेव,नामदेव,तुकाराम यांच्याबरोबरच संत चोखामेळा,संत सावता माळी,संत नरहरी सोनार,संत सेना न्हावी,संत शेख महंमद, संत बंका महार,गोरा कुंभार अशी विविध जाती धर्मातील संत आपणास दिसतात. जातीभेदाबरोबरच स्त्री-पुरुष भेदही भक्ती संप्रदायात नाकारलेला आहे. म्हणूनच संत मुक्ताबाई,जनाबाई, सोयराबाई, महदंबा, कान्होपात्रा,निर्मला अशा स्त्रिया या भक्तीसंप्रदायात येऊन धीटपणे व्यक्त होऊ शकल्या. त्यामुळेच एक अध्यात्मिक लोकशाही या संप्रदायामध्ये निर्माण झाल्याचे म्हटले जाते.

संत साहित्याच्या प्रासंगिकतेबाबत विचार करताना संतांनी तत्कालीन परिस्थितीत जे आवश्यक होते ते केले हे ठीकच. परंतु आजच्या आधुनिक,विज्ञान युगात संतांचे विचार खरंच कालसुसंगत आहेत का? बाराव्या - तेराव्या शतकातील विचार आज कालबाह्य ठरत नाहीत का? असाही सूर अधूनमधून उमटत असतो.अर्थात प्रत्येक विचारांची काळानुरूप तपासणी,समीक्षा झालीच पाहिजे परंतु खरं,दर्जेदार साहित्य हे अक्षर असतं. मग भलेही ते काल्पनिक असो की वास्तववार आधारित परंतु त्यातून साहित्यिकाने काहीतरी विचार,सूत्र मांडलेले असते जे त्याच्या अनुभवाचा, चिंतनाचा परिपाक असते ते दिशादर्शक ठरते. त्याला स्थळ - काळाच्या मर्यादा पडत नाहीत.

संतसाहित्यही आपल्या थोर प्रभृत्तींनी आपल्या अनुभवातून,चिंतनातून मांडलेलं जीवनाचं सार आहे. ते कालबाह्य कसे होऊ शकेल.अर्थात सगळ्याच गोष्टी जुनं ते सोनं म्हणून कवटाळण्यातही काही हशील नसते परंतु जे जे समाजजीवनाला आकार आणि संस्कार देण्यास पूरक, सहायक असते ते स्थल काल मर्यादेच्या पलीकडे गेलेले असते. संतांच्या समकाळातील,बाराव्या - तेराव्या शतकातील परिस्थिती, प्रश्न,समस्या आज कदाचित नसतीलही किंवा नव्या रूपात त्या पुढे येत असतील परंतु माणूस म्हणून आपली जी मूळ प्रवृत्ती, मानसिकता आहे व त्याच्याशी संबंधित ज्या समस्या,बाबी आहेत त्या आज पूर्णतया सुधारलेल्या आहेत असे आपण म्हणू शकत नाही. संतांनी आपल्या साहित्यातून जीवनाचा,सत्याचा जो शोध घेतला,विचार मांडला तो चिरंतन काळासाठी दिशादर्शक ठरतो त्यामुळेच आजही ज्ञानेश्वर,तुकाराम आदी संत केवळ महाराष्ट्रात, भारतातच नव्हे तर भारताबाहेरही अभ्यासले जातात.

संत साहित्यातून जीवनादर्शांचा शोध घेण्याचा प्रयत्न असतो. एकार्थाने तो स्वत्वाचा, सत्वाचा शोध असतो. तो एखाद्या विशिष्ट काळात मांडला म्हणून पुढच्या काळात तो कालबाह्य ठरत नाही. संत साहित्याच्या स्थलकालातीततेबाबत संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.यू.म.पठाण म्हणतात "सत् प्रवृत्ती आणि असत् - प्रवृत्ती यांच्या ताण्याबाण्यातून आपलं जीवन जडतघडत असतं. ते कसं घडत असतं नि कसं घडायला हवं या दोन पदरांमध्ये जीवनाच्या या महावस्त्राची वीण संत विणत असतात. त्यातलं जे भव्य,दिव्य नि उदात्त आहे, त्याचा मागोवा संत घेत असतात. यालाच कदाचित आपण संतांचा आत्मशोध म्हणत असू. आपल्यामधील हे आत्मतत्त्व परमात्मतत्वाप्रमाणं नितळ,निर्मळ,मंगल,पवित्र,शुचिर्भूत,कल्याणमय नि आनंदमय असतं. त्यात सत्य,शिव नि सुंदर या त्रयीचा समन्वय झालेला असतो.जीवात्म्याचा परमात्म्यापर्यंतचा प्रवास या उदात्त जीवनादर्शांतूनच होत असतो.त्यामुळे ऐहिक जीवनही सफल होतं नि पारमार्थिक जीवनही सफल होतं. या उदात्त जीवनादर्शांचं प्रतिबिंब संत साहित्यात उमटत असतं. त्यामुळं त्याला स्थलकालाची मर्यादा पडत नाही.त्यात शाश्वत,अ-क्षरत्व येतं. कोणत्याही काळात ते वाचलं तरी त्यातून या उदात्त जीवनमूल्यांची प्रचिती येते. त्यातच जीवनाची भव्यता,दिव्यता सामावलेली असते. त्यांना विशिष्ट स्थळाची,प्रदेशाची, देशाची वा काळाची मर्यादा कशी पडणार?"[२] त्यामुळे अनेक शतकांच्या नंतरही संतसाहित्याची, त्यातील विचारांची उपयुक्तता,प्रासंगिकता ठळकपणे जाणवणारी आहे.

बाराव्या शतकात सरंजामशाही व्यवस्थेत अज्ञान,वर्णव्यवस्थेतून प्रत्ययास येणाऱ्या भेदाभेदावर संतांनी प्रहार केले.आज जातीभेद संपला आहे का? याचे उत्तर ज्याने त्याने शोधावे.जातिभेद अप्रमाण मानून सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा संतांचा विचार आज कोणत्या अर्थाने आपण कालबाह्य मानणार आहोत? उलट आज उच्चशिक्षित म्हणवल्या जाणाऱ्या लोकांमध्ये जातींच्या भिंती वेगळ्या

प्रकारे किंबहुना पूर्वीपेक्षा अधिक भक्कमपणे उभ्या असलेल्या दिसतात. लोक समोर बोलत नाहीत परंतु मनात आपली जात बाळगून असतात. राजकीय नेत्यांनी आपल्या स्वार्थासाठी विविध जाती-जमाती, धर्मांना परस्परांत झुंजवत ठेवण्यासाठी धर्माचा केलेला पद्धतशीर वापर,त्यातून उसळणारे जातीय,धार्मिक वाद, दंगली,जातीपातींनी साधुसंत,देव देवतांची केलेली विभागणी,धार्मिक उन्माद, हिंसा, दहशतवाद अशा परिस्थितीत संतांच्या विचारांची निकड अधिक प्रमाणात जाणवू लागली आहे.

प्राचीन काळात शिक्षणाच्या अभावामुळे अज्ञानी,अंधश्रद्ध बनलेल्या समाजाला संतांनी लोकशिक्षकाच्या भूमिकेतून नवा विचार दिला.

नवसे सायासे पुत्र होती| मग का करणे लागे पती|| यासारख्या संत तुकाराम यांच्या अभंगातून विज्ञानवादाचा केलेला पुरस्कार किंवा

डोई वाढवूनि केश| भुते आणिती अंगास|

तरी ते नव्हेती संतजन| तेथे नाही आत्मखूण|| किंवा

भगवे तरी श्वान| सहज वेष त्याचा|

तेथ अनुभवाचा| काय पंथ||

अशा अभंगातून भोंदू, दिखाऊ साधू संतांवर तिखट शब्दांत संतांनी टीका केली. आज मानवाने सर्वच क्षेत्रात प्रचंड प्रगती केली.वैज्ञानिक शोधांनी जीवन सुखमय बनले. आपण सर्वजण विज्ञानाचे लाभ घेतो पण मनाने विज्ञानवादी झालो का? शिक्षण,नवे ज्ञान मिळाल्याने आमच्यातील अज्ञान, अंधश्रद्धा दूर झाली का? खरा देव,धर्म आम्ही समजून घेतला का? या प्रश्नांची बव्हंशी उत्तरे नकारात्मकच येतील. माध्यमांतील बातम्यांवर नजर टाकली तर आजही गुप्तधनासाठी अमुकचा बळी, निवडणुकीत यशासाठी यज्ञयाग, संतान प्राप्तीसाठी, यशप्राप्तीसाठी नवस- सायास, कर्मकांड विशिष्ट पर्वणीत गंगास्नानासाठी गर्दी, बाबांचे चमत्कार अशा बातम्यांतून आपली वाटचाल विज्ञानयुगाकडे आहे की अंधश्रद्ध समाजव्यवस्थेकडे हेच कळत नाही. अशाप्रसंगी अनाठायी कर्मकांडाचा आधार घेणाऱ्या, गोंधळलेल्या समाजासाठी संत तुकारामांच्या

जाऊनिया तीर्था| काय तुवा केले|

चर्म प्रक्षाळिले| वरीवरी|| किंवा

आली सिंहस्थ पर्वणी| न्हाव्याभटा झाली धणी|| किंवा

तीर्थी धोंडा पाणी| देव रोकडा सज्जनी|| अशा प्रबोधनपर विचारांची,साहित्याची,निरूपणाची गरज वाटते.

मध्ययुगीन काळात संतांनी कुठलीही अपेक्षा,स्वार्थ न ठेवता ईश्वर भक्ती व समाजोन्नतीचा ध्यास बाळगला. रंजल्या- गांजलेल्यांच्या सेवेत देव पाहिला. आजही असे काही परोपकारी असतीलही

परंतु, बहुतेक साधुसंत हे कॉर्पोरेट बनले आहेत. संतांची मठं, संस्थानं, त्यांची करोडोंची संपत्ती, तसाच अनुयायी वर्ग हे सगळेच डोळे विस्फारणारे आहे. संतांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी| ज्ञानदीप लावू जगी| म्हणत कीर्तन, प्रवचन,भारुड इत्यादीच्या माध्यमातून जनसामान्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले हे करताना कुठल्याही द्रव्यलाभ अथवा प्रसिद्धीचा सोस त्यांनी बाळगला नाही.सोने-नाणे मृत्तिकेसमान मानले परंतु आजचे स्वतःला संत म्हणवणारे महाराज, बाबा बुवा एकेका कीर्तन, प्रवचन, कथा निरुपणासाठी हजारो- लाखो रुपयापर्यंत धन घेत असतील तर ही संतांच्या विचारांशी प्रतारणा ठरेल. स्वार्थासाठी कीर्तन,प्रवचनांना व्यावसायिक रूप देणाऱ्या बाबा बुवांनी 'जेथ करावे कीर्तन| तेथे न सेवावे अन्न|| हा संतांचा निस्वार्थ विचार समजून घेण्याची आवश्यकता आहे.

धन, पैसा हे जीवन जगण्यासाठी आवश्यक आहेच पण ते म्हणजेच सर्वस्व नाही ही गोष्ट आज आपण सर्वजण विसरून धनाच्या,पैशाच्या पाठीमागे धावत आहोत. पैशांसाठी वाटेल ते करण्याची प्रवृत्ती,भ्रष्टाचार, लाचलुचपत अनिती इत्यादीचे प्रमाण वाढल्याने समाजाची नैतिक पातळी खालावताना दिसते आहे. अशाप्रसंगी 'जोडोनिया धन|उत्तम व्यवहारे| उदास विचारे| वेच करी|| हा संतांचा विचार निश्चितच मार्गदर्शक आहे.विवेकनिष्ठा हा संत साहित्याचा पाया आहे.भारतातील विविध संप्रदायातील संत साहित्याने सकल मानवाच्या कल्याणाचा विचार मांडला. "ज्ञानदेव-नामदेव-तुकोबादी संतांनी अद्वैत तत्वज्ञानाच्या माध्यमातून एकात्मतेचा पुरस्कार केला.जैन संतांनी अहिंसा, सहिष्णुता, स्त्रीपुरुष समानता यांचं महत्त्व प्रतिपादिलं. सूफी संतांनी धार्मिक सामंजस्य नि एकात्मतेची शिकवण दिली. नाथसंप्रदायानं योगातील चित्तवृत्तीनिरोधाच्या सूत्राचा पुरस्कार करून मन:शांतीचा मार्ग दाखविला. नागेश संप्रदायानं जातीधर्मांतील समन्वयात्मक दृष्टिकोन केवळ प्रतिपादिलाच नाही तर प्रत्यक्ष आचरणात आणला. समर्थ संप्रदायाच्या साहित्यातून 'प्रपंचविज्ञाना'च्या द्वारे प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घातली असून 'सत' आणि असत्' यांत विवेक करण्याचा बोध केला.ख्रिस्ती संत साहित्याने आपण सर्वजण एकाच प्रभूची लेकरं आहोत असं सांगून परस्परांत प्रेमभावाची बीजं पेरली."[3]
संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून सकल विश्वाच्या,प्राणिमात्राच्या कल्याणाची कामना केली.

आज माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट,विज्ञानाचे शोध,नवीन तंत्रज्ञान, दळणवळणाची साधनं, माध्यमं ज्यामुळे संपूर्ण जनजीवन पूर्णपणे बदलले आहे. ते गतिमान झालेले दिसत असले तरी याच्याच परिणामस्वरूप वाढता चंगळवाद, भांडवलशाही,मानसिक,सामाजिक अस्थैर्य यामुळे अनेक नवे प्रश्नही निर्माण झाले आहेत. वाढती अनैतिकता,भ्रष्टाचार,संस्कारहीन नवी पिढी,हिंसा, स्वैराचार, भोगवाद,अध:पतन यासारख्या समस्यांनी समाज पोखरून निघत आहे. अशावेळी 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा काय भुललासी वरलिया रंगा' या बाह्यांगावरून पारख करण्यापेक्षा माणसाचे अंतरंग ओळखा ही शिकवण देणाऱ्या संत चोखामेळा यांची किंवा 'कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी' या

अभंगातून कामात देव पहा हा कर्मसिद्धांत सांगणाऱ्या संत सावतामाळी यांच्या विचारांची गरज आहे. समाजाला संतांच्या सहिष्णू, नैतिक,समताधिष्ठित, मानवतावादी,बुद्धीप्रामाण्यवादी व विवेकनिष्ठ विचारांची खरी आवश्यकता आहे. त्यामुळे समाज भौतिकदृष्ट्या कितीही पुढारला, प्रगत झाला तरी त्याच्या सांस्कृतिक,अंतरिक प्रगतीसाठी, मानसिक स्वास्थ्यासाठी मूल्याधिष्ठित विचारांची अपरिहार्यता असतेच. संतसाहित्य हे अशा नैतिक, सामाजिक, विश्वात्मक मूल्यांचा मोठा ठेवा आहे त्यामुळे त्याची उपयुक्तता,प्रासंगिकता कालही होती, आजही आहे आणि उद्याही असणार आहे हे निश्चित.

**संदर्भ:**

१) सरदार, गं.बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मयगृह, मुंबई.आठवी आवृत्ती डिसें.२०१० पृ.१२

२) पठाण, डॉ.यू.म., मध्ययुगीन मराठी संतसाहित्य: काही आयाम, स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद प्र.आ. जून २००३ पृ.२३

३) तत्रैव,पृ.१३७

४) मोहरीर, डॉ.ल.का., संत तुकारामांची जीवननिष्ठा, सविता प्रकाशन, औरंगाबाद. २५ में १९९४